**स.फौ.के. नं. १८८/२०२४**

**नि. क्र. १७**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – नितीन बाळकृष्ण जाधव,

**वय** – ४४ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पोलीस हेड कॉ./१०२७),

**सध्या नेमणूक** – देवरुख पोलीस ठाणे अंतर्गत साखरपा पोलीस दुरक्षेत्र, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून** –

**०१.** दिनांक ३१/०५/२०२४ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख अंतर्गत असलेल्या साखरपा पोलीस दूरक्षेत्र येथे कार्यरत होतो. त्यादिवशी आम्हाला गोपनीय माहिती मिळाली की, मुर्शी गाडेवाडी येथे गावठी दारु विक्रीचा चोरटा व्यवसाय चालतो.

**०२.** त्यावरुन, पोलीस निरीक्षक श्रीमती मुजावर मॅडम यांच्या यांच्या मादर्गदशनाखाली मी, चालक–पो.शि./९४ श्री. नटे, पोलीस शिपाई/१६०७ श्री. लाड व पोलीस हेड कॉ./१५५१ श्री. करांडे असे आम्ही छाप्याकामी लागणारे साहित्य घेवुन एमएच–०८–एएक्स–७१०३ ने सरकारी वाहनाने निघालो.

**०३.** आम्ही मुर्शी गाडेवाडी येथे आमचे वाहन उभे केले. तेथे दोन इसमांना पंच म्हणून बोलावले. त्यांना छाप्याबाबत माहिती दिली. त्यानंतर पंच व आम्ही पोलीस असे आम्ही मुर्शी गाडेवाडीकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्याने लक्ष ठेवून पायी निघालो. त्यावेळी, १०० मीटर अंतरावर रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाझुडुपाच्या आडोशाला एक इसम त्याच्या पुढयात एक पांढऱ्या रंगाचा प्लॅस्टीकचा कॅन व ०१ ग्लास घेवून बसलेला आम्हाला दिसला. आम्हाला त्याचा संशय आला. आम्ही त्याला जागीच १३:२० वाजता पकडले. आम्ही त्याच्याकडील बाबींची पाहणी केली असता त्याच्या ताब्यात ०५ लिटर मापाच्या प्लॅस्टीक कॅनमध्ये ०५ लिटर गावठी हातभट्टीची दारु मिळून आली.

**०४.** आम्ही पंचांसमक्ष त्या इसमाला त्याचे नाव–गाव विचारले असता त्याने

त्याचे नाव नारायण सिताराम दळवी, राहणार – मुर्शी, खैरवाडी, असे सांगितले.

**०५.** त्याठिकाणी मी पंचांसमक्ष १८० मिली क्षमतेच्या एका बाटलीत मिळून आलेल्या मुद्देमाल दारुपैकी काही दारु रासायनिक पृथःकरणाकरीता काढून घेतली. त्या नमूना बाटलीला व कॅनला पंचांच्या व पोलीसांच्या सहयांचे लेबल चिकटविले. त्याठिकाणी मिळून आलेला मुद्देमाल ताब्यात घेतला. तेथे त्याबाबत पंचनामा पंचांसमक्ष १३:३० ते १४:३० च्या दरम्यान करण्यात आला. *(साक्षीदारास घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी व दोन पंचांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावेळी नकाशा देखील रेखाटण्यात आला होता. (सदर* ***पंचनाम्याला निशाणी क्रमांक १८*** *देण्यात येते).*

**०६.** त्यावेळी पोलीस हेड कॉ./१५५१ श्री. करांडे यांनी त्यांच्या खाजगी मोबाईलवर छायाचित्रे घेतली. *(साक्षीदारास प्रकरणातील छायाचित्रे दाखविण्यात आली). त्यामध्ये मी, आरोपी, दोन पंच व फिर्यादी असे दिसत आहेत.*

**०७.** त्यानंतर आम्ही मिळून आलेल्या मुद्देमालासह पोलीस दूरक्षेत्र साखरपा येथे परत आलो. तेथे आल्यावर पो.शि.श्री. लाड, यांनी आरोपीविरुद्ध फिर्याद दाखल केली.

**०८.** आरोपी व मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. *(मुद्देमाल न्यायालयात जमा नाही).*

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेकडून –**

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, छाप्याकामी जाताना स्टेशन डायरीला नोंद केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, पंचांना कसे बोलाविण्यात आले, याचा उल्लेख पंचनाम्यात करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, मुर्शी गाडेवाडी येथे अनेक राहती घरे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी मुद्देमालासह तेथे मिळुन आल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यावेळी छायाचित्रकार उपस्थीत असल्यास त्याची सही पंचनाम्यावर घेतली जाते.

१०. हे म्हणणे खरे आहे की, नमुना मुद्देमाल घेण्याआधी ती बाटली निर्जंतुकीकरण करुन घेतली होती असा उल्लेख पंचनाम्यात करण्यात आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यापुर्वी मी व पंचांनी अंगझडती दिल्याचे पंचनाम्यात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,**

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.03.11 14:46:21 +0530

(रोहिणी आर. कुलकर्णी)

**दिनांक –१०.०३.२०२६** **न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,**

**स्थळः देवरुख** **जि. रत्नागिरी.**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 10/03/2026 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 10/03/2026 |
| Evidence uploaded on | : | 10/03/2026 |